# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२६

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### हिंगोली शहरातील वाहतुकीची समस्या सोडविण्याबाबत

**(१) ४५१ (२२-०४-२०२५) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली शहरातील वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढली असून वाहतुकीची समस्या सोडवण्यासाठी सन २००१ मध्ये १५ ते १६ लाख रुपये खर्च करून प्रत्येक चौकात उभारण्यात आलेले सिग्नल केवळ चार-पाच महिन्यानंतर बंद पडले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, वाहतूक समस्या सोडवण्यासाठी सदरहू बंद असलेले सिग्नल यंत्रणा तातडीने सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१०-०४-२०२६) :** (१) होय, खरे आहे.

(२) हिंगोली शहरात वाहतुकीच्या वर्दळीमध्ये वाढ झाल्याने शहरात वाहतूक सुरळीत व्हावी याकरीता उपाययोजना म्हणून शहरात अंदाजे ६० सिंग्नल यंत्रणा बसविणे आवश्यक आहे. परंतु सदरील बाब नगरपरिषद हिंगोली यांच्या स्तरावर असल्याने मुख्याधिकारी, नगर परिषद हिंगोली यांना सिंग्नल यंत्रणा बसविण्याबाबत पोलीस अधीक्षक, हिंगोली यांनी पत्राद्वारे कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भंडारा जिल्ह्यातील वृध्द कलावंतांच्या मागण्यांबाबत

**(२) १२६५ (२३-०४-२०२५) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यात सर्वस्तरीय कलावंत असून वृध्द कलावंतांना निवृत्ती वेतन मिळावे या प्रमुख

मागणीकरीता भंडारा येथील त्रिमुर्ती चौकात कलावंतांनी संगीतमय आंदोलनाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधले असल्याची बाब दिनांक १० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाशिम जिल्ह्यात वृध्द कलावंत मानधन समिती माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये स्थापन होऊनही पात्र कलावंतांना अद्याप मानधन मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी वृध्द कलावंतांना पेन्शन व कलावतांच्या अन्य मागण्याबाबतचे निवेदन मा.मुख्यमंत्र्यांना जिल्हाधिकारी यांच्यामार्फत पाठविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू वृध्द कलावंतांची पेन्शन तसेच राज्यातील भंडारा व वाशिमसह अन्य जिल्ह्यातील सर्वस्तरीय कलावतांना मानधन देणेबाबत व त्यांच्या इतर मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (२०-०५-२०२६) :** (१) हे खरे नाही. भंडारा जिल्ह्यातील सर्वस्तरीय कलावंतांची संगीतमय आंदोलन बाबतचे पत्र या कार्यालयाच्या अभिलेख्यामध्ये दिसून येत नाही. तथापि, जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा यांचेकडून सदर पत्र प्राप्त करून घेण्यात आले आहे.
(२) हे खरे आहे. मात्र सद्य:स्थितीत जिल्हा परिषद भंडारा यांच्याकडील दिनांक ४ जून, २०२५ च्या पत्रानुसार दिनांक २६ ऑगस्ट, २०२४ रोजी राजर्षी शाहू मान्यवर ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन निवड समितीतील अशासकीय सदस्याची नियुक्ती करण्यात आलेली आहे.
(३) हे खरे आहे. या बाबतचे श्री.परिणय फुके, मा.आमदार यांचे पत्र सांस्कृतिक कार्य संचालनालय या कार्यालयास दिनांक २० मे, २०२५ रोजी प्राप्त झालेले होते. त्या अनुषंगाने संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या दिनांक ३ जून, २०२५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडून अहवाल मागविण्यात आलेला आहे. सदर अहवालानुसार दिनांक २६ ऑगस्ट, २०२४ रोजी राजर्षी शाहू मान्यवर ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन निवड समितीतील अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात आली असून सन २०२१-२२, २०२२-२०२३, २०२३-२०२४ मधील प्रलंबित अर्जामधून निवड प्रक्रिया सुरु आहे.
(४) १. या संदर्भात सर्व जिल्ह्याच्या सदस्य सचिव तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना मानधन निवड समिती स्थापन करण्याबाबत दिनांक १२ मार्च, २०२५ व दिनांक ०२ जून, २०२५ रोजी पत्र पाठविण्यात आलेले आहे.
२. सर्व जिल्ह्याच्या राजर्षी शाहू मान्यवर ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन निवड समितीला कलावतांची निवड करुन निवड याद्या या संचालनालयास पाठविण्याबाबत दिनांक १२ मार्च, २०२५, दिनांक ०२ जून, २०२५ रोजी व दिनांक १३ जून, २०२५ रोजी कळविण्यात आलेले आहे.
३. ज्या जिल्हयांच्या निवड याद्या प्राप्त झाल्या आहेत त्यांना मानधन सुरु करण्यात आलेले आहे.
४. वाशिम जिल्ह्यातील ज्येष्ठ साहित्यिक कलावंत यांची मानधन योजनेसाठी निवड प्रक्रिया सुरू आहे.
(५) लागू नाही.

---

## राज्यातील ९०० चित्रपटगृहे बंद असल्याबाबत

**(३) १८२६ (२३-०४-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सिंगल स्क्रिनच्या स्पर्धेत मल्टिफ्लेक्स थिएटर आल्याने एक पडदा चित्रपटगृहांचे अस्तित्व धोक्यात आल्याने १४०० चित्रपटागृहांपैकी ९०० चित्रपटगृहे असल्याची धक्कादायक बाब दिनांक ३ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, एकीकडे दिवसेंदिवस कमी होत असलेली प्रेक्षकसंख्या व दुसरीकडे शासनाचे विविध कर यांमुळे राज्यातील चित्रपटगृह बंद पडण्याच्या मार्गावर आले आहेत व सिंगल स्क्रीन थिएटर मालक करमणूक कर, जीएसटी, पाणी, वीज बिल, पगार व मेटेनन्समुळे हैराण झाले असूनही चित्रपटगृहे कोणत्याही स्थितीत बंद करु नये, असा शासनाने आदेश दिल्याने थिएटर मालक यांना आर्थिक तोट्यास सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय;

(३) असल्यास, राज्यातील चित्रपटगृह बंद होऊ नये यासाठी सिंगल स्क्रिन थिअटरला अनुदान जाहीर करावे,यासाठी ओनर्स ॲण्ड एक्झिबिटर्स असोशिएशन ऑफ इंडिया चे अध्यक्ष यांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व राज्यातील सिंगल स्क्रिन थिएटरला अनुदान देण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्यासाठी तसेच चित्रपटगृहांना चांगले दिवस प्राप्त करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०२६) :** (१) राज्यातील एकूण ५११ एकपडदा चित्रपटगृहांपैकी सद्य:स्थितीत ३१० चित्रपटगृहे कार्यरत असून, २०१ चित्रपटगृहे बंद स्थितीत आहेत.

(२) चित्रपटगृहे कोणत्याही स्थितीत बंद करु नये असा कोणताही आदेश शासनामार्फत निर्गमित करण्यात आलेला नाही.

(३) व (४) सिनेमा ओनर्स ॲण्ड एक्झिबिटर्स असोसिएशन ऑफ इंडिया, मुंबई यांनी एक पडदा चित्रपटगृहांना पुनर्विकासासाठी अनुदान व सवलतीच्या दरात कर्ज देण्याची मागणी केली आहे. तथापि, चित्रपटगृहाला अनुदान देण्याबाबत गृह विभागाचे कोणतेही धोरण अस्तित्वात नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## राज्यातील कांदा निर्यातीत घट झाल्याबाबत

**(४) २६६३ (१८-०७-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वर्षभरात कांदा निर्यातीत ५ लाख टन घट झाली असल्याने बाजारात कांदयाचे भाव कमी झाल्याने त्याचा आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसला असल्याचे माहे मार्च.२०२५ च्या शेवटच्या

आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन कांदयाला योग्य दर मिळावेत यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री.जयकुमार रावल (२०-०४-२०२६) :** (१) हे खरे आहे.

केंद्रशासनाच्या दिनांक १३/०९/२०२४ च्या अधिसुचनेनुसार कांदा निर्यातीवरील कर ४० टक्के वरुन २० टक्के करण्यात आला होता.तथापि, राज्यातील सन २०२३-२४ च्या तुलनेत सन २०२४-२५ मध्ये कांदा निर्यातीत घट झाली. त्यामुळे राज्यात कांद्याची आवक वाढून मार्च, २०२५ दरम्यान कांद्याच्या दरात घट दिसून आली.
(२) राज्यातील शेतकऱ्यांचे हित विचारात घेऊन कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क रद्द करण्यासंदर्भात राज्य शासनाच्यावतीने सातत्याने केंद्रशासनाकडे केलेल्या पाठपुराव्यामुळे केंद्र शासनाने दिनांक २२/०३/२०२५ च्या अधिसूचनेन्वये कांदा निर्यातीवरील २० टक्के निर्यात शुल्क रद्द केले आहे. त्यामुळे एप्रिल, २०२५ पासून कांदा निर्यात सुरळित सुरू आहे.

राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी कांदा धोरण व विविध उपाययोजना सूचविण्यासाठी श्री.पाशा पटेल, अध्यक्ष, राज्य कृषी मूल्य आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय दिनांक १२/०६/२०२५ अन्वये समिती गठित करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात सोशल क्लब म्हणून नोंदणीकृत असलेल्या दोषी संस्थावर कारवाई करण्याबाबत

**(५) ३३६९ (१७-०७-२०२५) श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात 'सोशल क्लब' म्हणून नोंदणीकृत असलेल्या संस्थांची संख्या मोठ्या प्रमाणात असून यापैकी अनेक संस्था जुगाराचा अड्डा चालवीत असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तक्रारींच्या अनुषंगाने शासनाने आतापर्यंत दोषी संस्थांवर व त्यांना पाठीशी घालणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच भविष्यात 'सोशल क्लब'च्या नावाखाली होणारे गैरप्रकार थांबवण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०३-०६-२०२६) :** (१) व (२) नोंदणीकृत सोशल क्लबमध्ये जुगार खेळताना आढळून आल्याने माहे जुलै, २०२५ अखेरपर्यंत पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर शहर यांच्या परिक्षेत्रात १ गुन्हा, पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांच्या परिक्षेत्रात ५ गुन्हे, पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांच्या परिक्षेत्रात १ गुन्हा व पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांच्या परिक्षेत्रात १ गुन्हा दाखल करण्यात आला

आहे. सदर ८ गुन्ह्यांमध्ये एकूण रुपये ५७,५७,९९०/- इतक्या किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. उपरोक्त दाखल गुन्ह्यातील सोशल क्लबपैकी पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांच्या परिक्षेत्रातील सोशल क्लबचा परवाना रद्द करण्यात आला असून, उर्वरित परवाने रद्द करण्याची कार्यवाही सुरू आहे.

सदर प्रकरणी कोणीही पोलीस अधिकारी दोषी नसून, सोशल क्लबच्या नावाखाली होणारे गैरप्रकार थांबविण्यासाठी सोशल क्लबच्या अध्यक्षांसोबत बैठका घेऊन सूचना देणे, बातमीदारामार्फत माहिती मिळवून कायदेशीर कारवाई करणे इ. उपाययोजना करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अप्पर तहसिलदार कार्यालय पनवेल या ठिकाणी पदे निर्मिती करण्यास परवानगी मिळणेबाबत

**(६) ४७३९ (१४-१२-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील वाढते शहरीकरण व लोकसंख्येची वाढ यामुळे कामाचा वाढता ताण लक्षात घेता दिनांक २८ जून, २०२३ रोजी अप्पर तहसिलदार- पनवेल या नवनिर्मित मंजुरी मिळालेल्या कार्यालयासाठी १- नायब तहसिलदार, २- अव्वल कारकून, ४- महसूल सहाय्यक व १- वाहन चालक अशी पदे नव्याने मंजूर करण्यास वित्त विभागाकडून महसूल विभागास परवानगी देण्यास टाळाटाळ होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अप्पर तहसिल पनवेल यांच्या कार्यक्षेत्रात एकूण पाच महसुली मंडळात १०५ महसूल गावांचा समावेश असल्याने तसेच मोठ्या प्रमाणात होणारे नागरिकरण व औद्योगीकरण यामुळे सदरहू सर्व पदे मंजूर करणे अत्यंत गरजेचे असताना वित्त विभागाकडून सदर पदे मंजूर करण्यास परवानगी न मिळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरची आवश्यक सर्व पदे मंजूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (२५-०३-२०२६) :** (१) व (२) खरे नाही.

(३) महसूल व वन विभागाच्या अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयांसाठी गट-अ ते गट-ड संवर्गातील पदांचा आकृतिबंध सुधारित करण्याबाबतची व तदनुषंगिक पदनिर्मितीची कार्यवाही आस्था-०८ कार्यासनामार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कृषी पदवीधारकांना नोकर भरतीमध्ये प्राधान्य देण्याबाबत

**(७) ५२७८ (१४-१२-२०२५) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत शासकीय आणि निमशासकीय कृषी पदविका महाविद्यालयांतून दोन वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करून बाहेर पडलेल्या हजारो विद्यार्थ्यांना नोकरीपासून वंचित राहावे लागत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले असून राज्यातील कृषी पदविका धारकांच्या वतीने कृषी आयुक्त यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषी पदवीधारकांना नोकर भरतीमध्ये प्राधान्य देऊन ग्रामसेवक कृषी सेवक, कृषी सहाय्यक व अन्य पदावर नोकरी करण्याची संधी शासन उपलब्ध करून देण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय ?
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दत्तात्रय भरणे (०६-०४-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) ग्रामसेवकांची पदभरती ही ग्रामविकास विभागामार्फत स्वतंत्ररित्या करण्यात येते.
कृषी सहायक पदाचे सेवाप्रवेश नियम दिनांक २९ जानेवारी, २०१८ च्या अधिसूचनेनुसार भरतीविषयक कार्यवाही नियुक्ती प्राधिकारी या नात्याने विभागस्तरावर केली जाते.
कृषी सेवक ह्या संवर्गात नियुक्ती झाल्यानंतर ३ वर्षाच्या सेवनंतर कृषी सेवक संवर्गाचे रुपांतर सहायक कृषी अधिकारी (कृषी सहायक) असे होते.
सद्य:स्थितीत कृषी सेवक पदभरती महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्याचे प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ बंद करण्यात येणार असल्याबाबत

**(८) ५४३१ (१४-१२-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील फळबागांना चालना देण्यासाठी सन २००५ मध्ये स्थापन केलेले महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ बंद करण्यात येणार असल्यामुळे फळबाग लागवडीवर मोठ्या प्रमाणात परिणाम होऊन शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत येणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महामंडळ बंद न करता सर्व रिक्त पदे तात्काळ भरून राज्यातील फळ लागवडीस प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले (०२-०६-२०२६) :** (१) अंशतः खरे आहे.
शासन निर्णय क्र. राफअ २०२५/ प्र.क्र.१७२/९-ए (E-११८२०२९) दिनांक ०३/१०/२०२५ अन्वये राज्य स्तरावरील मंडळ बंद करण्यात आले असून सदर योजना संचालक (फलोत्पादन) यांच्याकडे वर्ग करण्यात आली आहे परंतु क्षेत्रिय स्तरावर या योजनेची अंमलबजावणी पूर्वीप्रमाणे कृषी विभागाचे

अधिकारी कर्मचारीच करत असून फळबाग लागवडीच्या योजनांची अंमलबजावणी नियमितपणे सुरु आहे.
(२) फळबाग लागवडीच्या महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत नाविन्यपूर्ण फळे लागवड योजना नियमितपणे सुरु आहेत. तसेच, संचालक (फलोत्पादन) यांना आवश्यकतेप्रमाणे लागणाऱ्या अधिकाऱ्यांचा समावेश आकृतीबंधात करण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर व सांगली जिल्ह्यात अलमट्टी धरणाच्या उंचीवाढीमुळे पूर परिस्थिती निर्माण होणार असल्याबाबत

**(९) ६७२२ (०२-०३-२०२६) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलमट्टी धरणाला राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित करून त्याची उंची आणखी ५ मीटरने वाढविण्यात आल्यास कोल्हापूर व सांगली जिल्ह्यांमध्ये जलबुडीचा धोका अनेक पटीने वाढणार आहे, तसेच सन २०२५ मध्ये माहे ऑगस्ट, २०२५ महिन्यापूर्वी अलमट्टी धरण पूर्ण क्षमतेने भरून घेण्यात आल्यामुळे त्याच्या बॅकवॉटरचा परिणाम म्हणून कोल्हापूर व सांगली जिल्ह्यांमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत चार वर्षांच्या कालावधीत अशा पूरपरिस्थितीमुळे शेकडो गावे व लाखो हेक्टर शेती क्षेत्र पाण्याखाली जाऊन शेतकरी, नागरिक व सार्वजनिक मालमत्तेचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अलमट्टी धरणाच्या बॅकवॉटरमुळे कोल्हापूर व सांगली जिल्ह्यांना उद्भवणाऱ्या जलबुडीच्या कायमस्वरूपी धोक्यापासून संरक्षण करण्यासाठी शासनाने आजपर्यंत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०४-२०२६) :** (१) हे खरे नाही,

सन २०२५ मध्ये माहे ऑगस्ट महिन्यापूर्वी अलमट्टी धरण पूर्ण क्षमतेने भरलेले नव्हते. तसेच सन २०२५ मध्ये आयर्विन पूल, सांगली येथील पाणी पातळी, धोका पातळीच्या आत राहिल्यामुळे सांगली जिल्ह्यामध्ये महापूराची परिस्थिती उद्भवली नाही. परंतु सदरची पातळी ही इशारा पातळी ४० फुटांच्या वर ४३ फूट ६ इंच पर्यंत गेली होती व ती दोन दिवस होती.
(२) मागील चार वर्षात केवळ सन २०२१ मध्ये कमी कालावधीत अतिवृष्टी झाल्याने महापूर आला होता व त्यावेळी आयर्विन पूल, सांगली येथील महत्तम पाण्याची पातळी ५४’६” इतकी होती.

तसेच आयर्विन पूल सांगली येथील जास्तीत जास्त पाण्याची पातळी ही सन २०२२ मध्ये २९’११”, सन २०२३ मध्ये १८’९”, सन २०२४ मध्ये ४०’६” व सन २०२५ मध्ये ४३’६” होती म्हणजे फक्त २०२५ मध्ये आयर्विन पूल सांगली येथील पाण्याची पातळी इशारा पातळीच्या पुढे गेली होती, परंतु ती धोका पातळीच्या आत होती.

(३) अलमट्टी धरणाच्या बॅकवॉटरच्या परिणामाबाबत तसेच पूरपरिस्थितीबाबत अभ्यास अहवाल अंतिम होईपर्यंत उंचीवाढीचा निर्णय न घेण्याबाबत मा.मुख्यमंत्री, कर्नाटक राज्य यांना मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे स्तरावर दिनांक ०९/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच मा.केंद्रीय मंत्री, जलशक्ती मंत्रालय यांना मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे स्तरावर दिनांक २९/०७/२०२५ अन्वये पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

मा.मंत्री, जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांनी सर्वपक्षीय आमदार व खासदार यांचेसमवेत केंद्रिय मंत्री जलशक्ती मंत्रालय यांची दिनांक ०४/०८/२०२५ रोजी भेट घेऊन अलमट्टी धरण उंचीवाढबाबत चर्चा केली आहे.

कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील कृष्णा व भीमा नदी खोऱ्यातील पूरनियंत्रण व पूर व्यवस्थापनासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम Maharashtra Resilience Development Program (MRDP) शासनामार्फत हाती घेण्यात आला आहे. या कार्यक्रमांतर्गत पूर विषयक उपाययोजना म्हणून कृष्णा व पंचगंगा नदीपात्रातील गाळ काढून खोलीकरण करणे, नदीचे काठ काटछेदामध्ये करणे, नदीकाठची धूप थांबवणे इत्यादी बाबी अंतर्भूत आहेत.

अलमट्टी धरणाच्या साठ्याचा (R.L. ५१९.६० व R.L. ५२४.२५६ पर्यंत) महाराष्ट्रावर होणारा परिणाम फेर अभ्यासण्यासाठी National Institute of Hydrology (NIH), Roorkee या संस्थेची नियुक्ती करण्यात आली होती.

दिनांक १२/११/२०२५ रोजी राष्ट्रीय जलविज्ञान संस्था (NIH), रुरकी यांचेकडून अंतिम अहवाल प्राप्त झाला असून त्यामधील सारांश व निष्कर्ष याबाबत अभ्यास करून पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शालेय शिक्षण विभागातील वरिष्ठ व क्षेत्रिय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्यामुळे प्रशासकीय कामकाजावर ताण येत असल्याबाबत

**(१०) ६७७२ (१७-०३-२०२६) श्री.सुधाकर अडबाले, श्री.संदीप जोशी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शालेय शिक्षण विभागातील शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), उपशिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी तसेच इतर संबंधित अधिकाऱ्यांची अनेक पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अनेक विभागांमध्ये व जिल्ह्यांमध्ये नियमित पदे रिक्त असून सद्य:स्थितीत माहे नोव्हेंबर, २०२५ पासून जिल्हा परिषदेच्या माध्यमिक विभागात पूर्ण वेळ शिक्षणाधिकारी यांची नियुक्ती न करता या पदाचा कार्यभार अद्याप पर्यंत प्रभारी शिक्षणाधिकाऱ्यांमार्फत कामकाज चालविले जात असल्याने वेळेअभावी माध्यमिक शालेय शिक्षण विभागातील अनेक महत्वाची कामे प्रलंबित असून सदर रिक्त पदे नियमित नियुक्तीने किंवा पदोन्नतीद्वारे भरण्यात न येण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शालेय शिक्षण विभागातील विविध स्तरांवरील रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दादाजी भुसे (३०-०४-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३)(i) शासन निर्णय दिनांक २०/१०/२०२५ अन्वये शिक्षण उपसंचालक संवर्गात एकूण १० अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे.
(ii) विभागाच्या दिनांक ०२/०२/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये शिक्षणाधिकारी संवर्गातील १३ पदे पदोन्नतीने भरण्यात आली आहेत.
(iii) दिनांक २४/०९/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये उपशिक्षणाधिकारी व तत्सम संवर्गातील ९७ पदे व दिनांक २४/०४/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये ५१ पदे याप्रमाणे एकूण १४८ पदे पदोन्नतीने भरण्यात आलेली आहेत.
(iv) दिनांक ०४/११/२०२५, दिनांक १८/०३/२०२६ व दिनांक १६/०४/२०२६ अन्वये मर्यादित विभागीय परीक्षेव्दारे उपशिक्षणाधिकारी संवर्गातील एकूण ५१ पदे भरण्यात आली आहेत.
(v) सरळसेवेने नियुक्त शिक्षणाधिकारी संवर्गातील १८ व उपशिक्षणाधिकारी संवर्गातील १०८ अधिकारी एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत (सीपीटीपी १० व ११) प्रशिक्षण घेत आहेत.

सदर परिविक्षाधीन अधिकारी यांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना नियमित पदभार/पदस्थापना देण्यात येणार आहे. विभागाच्या अधिनस्त सर्व संवर्गातील सरळसेवेची व पदोन्नती कोट्यातील रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात संकलित मूल्यमापन चाचणी अंतर्गत प्रश्नपत्रिका वितरणातील त्रुटींबाबत

**(११) ६८७५ (१८-०३-२०२६) श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती आणि अध्ययनातील अडथळे ओळखण्यासाठी साधन म्हणून घेतली जाणारी संकलित मूल्यमापन चाचणी (PAT) राज्यातील शाळांमध्ये सुरू झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चालू वर्षी सदर संकलित मूल्यमापन चाचणी इयत्ता निहाय दिनांक १०, ११ व १३ ऑक्टोबर,२०२५ रोजी घेण्यात आली असून राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेतर्फे (SCERT) या चाचणीसाठीच्या प्रश्नपत्रिका संबंधित शाळांना विद्यार्थी संख्येप्रमाणे पुरविण्यात येतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रश्नपत्रिका माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हास्तरावर वितरित केल्या जाणे अपेक्षित होते, तसेच गटशिक्षणाधिकारी, प्रशासन अधिकारी व तालुका समन्वयक यांच्या देखरेखीखाली प्रश्नपत्रिका थेट शाळांपर्यंत पोहोचवल्या जातील असे सांगण्यात आले असूनही अनेक शाळांना प्रश्नपत्रिका वेळेवर मिळाल्या नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अंशतः अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांना या चाचणीसाठीच्या प्रश्नपत्रिका मिळाल्या नाहीत तसेच मागील दोन वर्षांपासून सतत संकलित मूल्यमापन चाचणीच्या प्रश्नपत्रिका कमी प्रमाणात मिळत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांना संकलित मूल्यमापन चाचणीच्या प्रश्नपत्रिका मुबलक मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१८-०५-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) सदर चाचणीचे आयोजन समग्र शिक्षा अंतर्गत राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्था तसेच खाजगी अनुदानित शाळांमधील इ.२ री ते इ.८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी करण्यात येते.

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्याकडून प्राप्त विद्यार्थी संख्येनुसार चाचणी पत्रिका वितरीत केल्या जातात. कमी चाचणी पत्रिका मिळाल्यास तात्काळ पोहोचवल्या जातात. तसेच ५% वाढीव चाचणी पत्रिका प्रत्येक तालुक्याला/URC ला दिल्या जातात.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सैनिकी शाळांना टप्पा वाढ देण्याबाबत

**(१२) ७०२१ (२४-०३-२०२६) श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अंशतः अनुदानित व अवशेष शाळांना शासनाने टप्पा वाढ अनुदानाचा दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ रोजी शासन निर्णय काढला असून यशवंतराव सैनिक शाळा सुपखेला वाशिम, ईश्वर देशमुख सैनिक शाळा दिग्रस,राजीव गांधी सैनिक शाळा बुलढाणा आणि पार्थ सैनिक शाळा जालना यांना सदर शासन निर्णयानुसार अनुदान टप्प्यासाठी समाविष्ट करण्यात आले होते. परंतु दिनांक २५ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार यांची नावे वगळण्यात आली असल्याचे माहे जानेवारी,२०२६ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास अनुदान टप्पा वाढ देण्याकरीता शासनाने निधीची तरतूद करूनही यशवंतराव सैनिक शाळा सुपंखेला वाशिम, ईश्वर देशमुख सैनिक शाळा, दिग्रस, राजीव गांधी सैनिक शाळा बुलढाणा व पार्थ सैनिक शाळा जालना या सैनिकी विद्यालयातील शिक्षकांना अनुदान टप्पा वाढ अजूनही मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ रोजी टप्पा वाढीचा शासन निर्णय काढूनही उक्त सैनिकी शाळांना अनुदानाचा टप्पा वाढ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०९-०४-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक १७ जुलै, २०२५ रोजीच्या बैठकीत अनुदान टप्पावाढ करण्यासंदर्भात निर्गमित केलेला दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ चा शासन निर्णय रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर राज्यातील खाजगी विनाअनुदानित व अंशत: अनुदानित शाळा व तुकड्या व त्यावरील कार्यरत शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांना टप्पा अनुदान मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार दिनांक २५ ऑगस्ट, २०२५ रोजीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. सैनिकी शाळांचा सदर शासन निर्णयात समावेश करण्यात आलेला नाही.

राज्यातील यशवंतराव सैनिक शाळा सुपखेला, वाशिम, ईश्वर देशमुख सैनिक शाळा, दिग्रस, राजीव गांधी सैनिक शाळा बुलढाणा व पार्थ सैनिक शाळा, जालना या सैनिकी शाळांच्या अतिरिक्त तुकड्यांना अनुदानाचा वाढीव टप्पा देण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

---

## राज्यातील सूतगिरण्यांना अपारंपरिक स्त्रोतातून वीज उपलब्ध करून देण्यकरीता उपाययोजना करणेबाबत

**(१३) ७३२३ (१८-०३-२०२६) श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सूतगिरण्यांना वस्त्रोद्योग विभागामार्फत वीज दरात अनुदान देण्यात येत असून सध्याच्या परिस्थितीमध्ये सूतगिरण्यांना आवश्यक असलेली वीज सौर, पवन अथवा इतर अपारंपरिक ऊर्जास्त्रोतांमधून निर्माण व्हावी याकरीता केंद्र व राज्य शासनामार्फत सूतगिरणी चालकांसाठी विविध प्रोत्साहनात्मक योजना प्रस्तावित करण्यात आल्या असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनांबाबत माहिती असूनही अनेक सूतगिरणी चालक अपारंपरिक ऊर्जेच्या वापराबाबत अनुत्साही असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सूतगिरणी चालकांच्या अडचणी जाणून घेऊन तसेच आर्थिक, तांत्रिक व प्रशासकीय अडचणी दूर करून त्यांना आवश्यक असलेली वीज अपारंपरिक स्त्रोतांमधून उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.संजय सावकारे (१४-०५-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

वस्त्रोद्योग घटकांच्या होणाऱ्या खर्चामध्ये वीज वापरावरील खर्चाचा खुप मोठा वाटा आहे. वस्त्रोद्योग घटकांवरील हा भार कमी करण्यासाठी राज्याचे वस्त्रोद्योग धोरण सन २०२३-२०२८ मध्ये वस्त्रोद्योग घटकांना भांडवली अनुदान, वीज सवलत, सौर ऊर्जा संयंत्र उभारणीसाठी अनुदान देण्यात येणार आहे. एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ मधील वीज अनुदान तसेच सौर ऊर्जा अनुदानाबाबत शासन निर्णय दिनांक ०६/०३/२०२४ अन्वये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयात प्रामुख्याने सर्व वस्त्रोद्योग घटकांना (विद्यमान व नवीन) एकात्मिक शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ च्या कालावधीकरीता परिशिष्ट अ मध्ये दिलेल्या दरानुसार वीज अनुदान प्रदान केले जात आहे. संपूर्ण धोरण कालावधीत वीज अनुदानासाठी कोणतीही कमाल मर्यादा नसेल असे नमूद करण्यात आलेले आहे. वस्त्रोद्योग घटकांच्या सौर ऊर्जा प्रकल्पासाठी सविस्तर मार्गदर्शक सुचना, दिनांक ०६/०३/२०२४

रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत. विद्यमान तसेच नवीन वस्त्रोद्योग प्रकल्पांना सौर ऊर्जा प्रकल्प करीता सौर ऊर्जा प्रकल्प किंमतीच्या २० टक्के किंवा ४.८० कोटी रुपयांपैकी जे कमी असेल तेवढे भांडवली अनुदान देण्याची योजना आहे.

(२) आयुक्तालयास प्राप्त सूतगिरण्यांचे निवेदनानुसार सौर ऊर्जेचा वापरासंबंधाने प्रामुख्याने १ मेगावॅट नेट मिटरींगची अट, सौर ऊर्जा प्रकल्प उभारल्यावर लोड फॅक्टर इन्सेंटीव्ह, बल्क कंझमशन रिबेट, इन्क्रिमॅन्टल कन्झमशन रिबेट, सवलती महावितरणकडून दिल्या जात नसणे, भांडवली गुंतवणूकीसाठी निधी उपलब्ध नसणे इत्यादी अडचणी येत आहेत. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने सौर ऊर्जेच्या वापराकरीता १ मेगावट नेट मिटरिंगची अट काढून ५ मेगावट पर्यंत सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यास परवानगी दिली आहे. परंतु, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांनी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांच्या या निर्णयाच्या विरुध्द न्यायालयात याचिका दाखल केलेली असून सदर १ मेगावॅट बाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

उपरोक्त प्रमाणे अपारंपरिक ऊर्जा प्रकल्प उभारतांना अडचणी येत असल्याचे सूतगिरणी चालकांचे म्हणणे आहे.

(३) राज्यातील वस्त्रोद्योग घटकांमध्ये सौर ऊर्जेचा वापर वाढविणेबाबत अ.मु.स. (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीची बैठक घेण्यात आली असून याबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) लागु नाही.

---

## राज्यातील अनुदानित महाविद्यालयांच्या नॅक मुल्यमापनाबाबत

**(१४) ७३८९ (१७-०३-२०२६) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व अनुदानित महाविद्यालयांना राष्ट्रीय मूल्यांकन व मानांकन परिषद (NAAC) यांचे मूल्यांकन पूर्ण करणे बंधनकारक असताना, अद्यापही अनेक अनुदानित महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन प्रक्रिया पूर्ण केलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हानिहाय एकूण १०० टक्के अनुदानित महाविद्यालयांची संख्या किती आहे तसेच जानेवारी, २०२६ अखेर नॅक मूल्यांकनाची प्रक्रिया पूर्ण केलेल्या अनुदानित महाविद्यालयांची जिल्हानिहाय संख्या किती आहे,

(३) असल्यास, माहे जानेवारी, २०२६ पर्यंत नॅक मूल्यांकन प्रक्रिया अद्याप पूर्ण न केलेल्या अनुदानित महाविद्यालयांची संख्या किती आहे व या महाविद्यालयांविरोधात शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१०-०४-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली १०० टक्के अनुदानित १२३२ महाविद्यालये आहेत. त्यापैकी १२०३ अनुदानित महाविद्यालयांनी नंक मूल्यांकन प्रक्रिया पूर्ण केली आहे.

नॅक मूल्यांकनाची प्रक्रिया पूर्ण केलेल्या अनुदानित महाविद्यालयाची संख्या विभागनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विभाग | अशासकीय अनुदानित महाविद्यालयांची विभागनिहाय संख्या | नॅक मूल्यांकन प्रक्रिया पूर्ण केलेल्या अनुदानित महाविद्यालयांची विभागनिहाय संख्या | नॅक मूल्यांकन अद्याप पूर्ण न केलेल्या महाविद्यालयांची संख्या | नॅक ने शिफारस न केलेल्या महाविद्यालयांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | अमरावती | १६१ | १५३ | ०६ | २ |
| २. | छत्रपती संभाजीनगर | १२० | ११५ | ०३ | २ |
| ३. | जळगाव | ८८ | ८८ | ०० | ० |
| ४. | कोल्हापूर | १३५ | १३५ | ०० | ० |
| ५. | मुंबई | १०३ | १०१ | ०२ | ० |
| ६. | नागपूर | २१५ | २०५ | ०८ | २ |
| ७. | नांदेड | ९९ | ९७ | ०२ | ० |
| ८. | पनवेल | ९६ | ९६ | ०० | ० |
| ९. | पुणे | १७२ | १७१ | ०१ | ० |
| १०. | सोलापूर | ४३ | ४२ | ०१ | ० |
| **एकूण** | | **१२३२** | **१२०३** | **२३** | **६** |

(३) जानेवारी, २०२६ अखेरपर्यंत नॅक मूल्यांकन प्रकिया अद्याप पूर्ण न केलेले एकूण २३ अनुदानित महाविद्यालये आहेत. तसेच ०६ महाविद्यालयांना नॅक ने मानांकानासाठी शिफारस केलेली नाही.
नॅक मूल्यांकन प्रकिया एकदाही न केलेले महाविद्यालयांबाबत शासनाने संबंधित सर्व सार्वजनिक विद्यापीठांना सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९ व कलम ११० या तरतूदीचा अवलंब करुन कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उष्माघाताने होणाऱ्या मृत्यूंचा नैसर्गिक आपत्ती म्हणून समावेश करण्याबाबत

**(१५) ७६७० (१७-०३-२०२६) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्ह्यासह राज्यातील सर्व जिल्ह्यांचा शासनाने तयार केलेल्या उष्मालाट कृती आराखड्यात समावेश करण्यात आलेला असून, उष्माघातामुळे होणाऱ्या मृत्यूंचा नैसर्गिक आपत्ती म्हणून समावेश करणे शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उष्माघात हा केंद्र सरकारच्या NDRF (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी) च्या यादीत 'नैसर्गिक आपत्ती' म्हणून पूर्णपणे समाविष्ट नाही. परंतु राज्य शासन आपल्या अधिकारात (SDRF अंतर्गत) विशेष परिस्थितीत मदत देऊ शकते. उष्माघाताला कायमस्वरूपी नैसर्गिक आपत्ती घोषित करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठवला असून सदर प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उष्माघातामुळे होणाऱ्या मृत्यूंचा नैसर्गिक आपत्ती म्हणून समावेश करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (३०-०३-२०२६) :** (१) महाराष्ट्र राज्य उष्मालाट कृती आराखडा २०२४ प्रसिध्द करण्यात आलेला आहे. उष्माघातामुळे होणाऱ्या मृत्यूंचा "नैसर्गिक आपत्ती" म्हणून समावेश करणे शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्याची बाब अंशत: खरी आहे.
(२) उष्माघात या आपत्तीला १६ व्या वित्त आयोगाने "नैसर्गिक आपत्ती" म्हणून वर्गीकृत केले आहे. त्यानुसार उष्माघात या आपत्तीला "नैसर्गिक आपत्ती" म्हणून घोषित करण्याची कार्यवाही NDMA कडून केली जात आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## जळगाव जिल्ह्यातील कुंड–जोंधनखेडा धरणाची उंची वाढविण्याबाबत

**(१६) ७६७७ (१८-०३-२०२६) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुंड–जोंधनखेडा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील धरणाची उंची वाढविण्याच्या कामास शासनाकडून मंजुरी देण्यात आली असूनही अद्याप प्रत्यक्ष कामे अपूर्णावस्थेत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धरणाची उंची वाढविण्याचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१८-०५-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) या योजनेंतर्गत मूळ उंचीनुसार धरणाचे काम सन-१९९७ मध्ये पूर्ण झाले आहे. मंजूर मूळ आराखड्यानुसार मुख्य कालव्याचे १.८० कि.मी लांबीचे काम पूर्ण असून वितरण प्रणालीचे काम बाकी आहे. उंचीवाढी अंतर्गत माती धरणाच्या उंचीवाढीचे काम पूर्ण करण्यात आले आहे व सांडवा उंचीवाढीचे काम प्रगतीत आहे.
(३) सांडवा उंचीवाढीचे काम करतेवेळी पाया पातळी सुमारे १.५ मी. इतकी खोल गेल्याने खोदकाम तसेच

संधानकाच्या परिमाणात वाढ होत आहे. सदरचे परिमाण वाढीसह तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

---

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू पदावर नियुक्ती करण्याबाबत

**(१७) ८३४८ (१८-०३-२०२६) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला अनेक वर्षाच्या प्रतिक्षेनंतर पूर्णकालीन कुलगुरू पदाची नियुक्ती करण्यात आली आहे तथापि, प्र. कुलगुरू पद भरले नसल्याने अद्यापपर्यंत रिक्त असल्याचे माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्र. कुलगुरू पद भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२४-०३-२०२६) :** (१) होय.
(२) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६च्या सुधारित कलम १३ (६) मध्ये विद्यापीठाची व्यवस्थापन परिषद कुलगुरूच्या शिफारशीवरून विद्यापीठासाठी प्र-कुलगुरूची नियुक्ती करील अशी तरतूद आहे. त्यानुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात प्र-कुलगुरुची नियुक्ती व्यवस्थापन परिषदेमार्फत करण्यात येणार येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक ते पुणे हा रेल्वे मार्ग मूळ रेखांकनानुसार करण्याबाबत

**(१८) २३७४८ (१४-०८-२०२४) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक ते पुणे या मार्गावर हाय स्पीड रेल्वे प्रकल्पासाठी महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत विकास कंपनी आणि भारतीय रेल्वे यांच्यामार्फत सन २०१७-२०१८ मध्ये सर्वेक्षण झाल्यानंतर हा मार्ग सिन्नर-संगमनेर-नारायणगाव - राजगुरूनगर मार्गे पुण्याला नेण्याचा आराखडा मंजूर झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२४ च्या सुरुवातीला अचानक या प्रकल्पात बदल करून हा मार्ग शिर्डी मार्गे पुण्याला नेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बदलामुळे या प्रकल्पाचा मूळ हेतु साध्य होत नसल्यामुळे विविध लोकप्रतिनिधींनी हा मार्ग मूळ रेखांकनानुसार करण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरील मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१५-०५-२०२६) :** (१) व (२) महारेलने सन २०१८ मध्ये सविस्तर सर्वेक्षण हाती घेऊन प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल रेल्वे बोर्डास सादर केला होता.महारेलने तयार केलेल्या अलाइनमेंटमध्ये, नाशिक ते पुणे हा मार्ग सिन्नर-संगमनेर-नारायणगाव-राजगुरुनगर मार्गे नेण्याची योजना आहे. तथापि, प्रस्तावित अलाइनमेंट ला महाकाय मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप वेधशाळेच्या (G.M.R.T.) अँटेनांमध्ये व्यत्यय येत असल्यामुळे राष्ट्रीय रेडिओ खगोल भौतिकशास्त्र केंद्राकडून (NCRA) विरोध होत आहे. त्यामुळे रेल्वे बोर्डाने सदर प्रकल्पासाठी महारेलला दिलेली तत्वत: मंजुरी काढून घेतली असल्याचे दिनांक २१/०८/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.
(३) होय.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नौपाडा पाचपाखाडी (जि.ठाणे) येथे महावितरण उपकेंद्र उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत

**(१९) २३८१६ (२२-०७-२०२४) अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नौपाडा पाचपाखाडी (जि.ठाणे) येथे मोठ्या संख्येने बहुमजली इमारती उभारल्यामुळे तेथे महावितरण उपकेंद्र उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागांमध्ये दूरच्या केंद्रांवरून वीजपुरवठा करावा लागत असल्यामुळे वीजपुरवठा वारंवार खंडीत होण्याची भीती असून नगरविकास विभाग, महानगरपालिका आणि महावितरण कंपनी यांच्या समन्वयातून वीज उपकेंद्रासाठी भूखंड उपलब्ध करून देण्याकरीता मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) श्री.महेंद्र मोने, वीज ग्राहक यांचे दिनांक १६/०९/२०२४ रोजी याबाबतचे निवेदन प्राप्त झाले आहे. सदर निवेदनानुसार शासनाने मंजूर केलेल्या ठाणे शहर विकास योजनेंतर्गत विद्युत उपकेंद्र प्रयोजनार्थ भूखंड आरक्षित केलेला नसल्याची माहिती ठाणे महानगरपालिकेने दिनांक ३०/०५/२०२४ अन्वये कळविली आहे. तसेच, दिनांक २७/१०/२०२५ अन्वये जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे २२/११ के व्ही GIS उपकेंद्र खोपट येथे उभारण्यासाठी अंदाजित ६५० चौ.मी. जागा उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे. महावितरण कंपनीच्यावतीने जिल्हा प्रशासनाकडे सदर पाचपाखडी येथे उपकेंद्र उभारणेसाठी जागा उपलब्ध होण्याकरीता पाठपुरावा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर शहरात इलेक्ट्रीक व्हेइकलकरिता चार्जिंग स्टेशन उभारण्याबाबत

**(२०) २४२७५ (२२-०७-२०२४) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इलेक्ट्रीक व्हेइकलच्या चार्जिंग स्टेशनसाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी महावितरणला नोडल एजन्सी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर परिमंडळामधील प्रत्येक विभागामध्ये महावितरणाच्या वतीने चार्जिंग स्टेशन उभारण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चार्जिंग स्टेशनकरिता एकूण किती खर्च अपेक्षित आहे व किती कालावधीत नागपूर शहरात चार्जिंग स्टेशन उभारण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०२६) :** (१) हे खरे आहे.

महाराष्ट्र राज्यात ईव्ही चार्जिंग स्टेशनकरीता आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित नोडल एजन्सी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्यात ईव्ही चार्जिंग स्टेशनकरीता आवश्यक पायाभूत सुविधा स्थापित करण्याचे काम महावितरण मार्फत डी.डी. एफ अथवा १.३% सुपरव्हीजन योजनेंतर्गत करण्यात येते.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.